# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**महत्वाचे**

क्रमांक :-विकाअ/शिक्षण/शुल्क/२०१५/2960

दिनांक 30 NOV 2015

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत व परीक्षेला बसण्यापासुन वंचित न करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/१८७८ दिनांक २३/११/२०१५.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासकमासाठी वेळोवेळी प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, अनुसचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग या सामाजिक सामास विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत व परीक्षेला बसण्यापासून वंचित न करणेबाबतचे मा. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे संदर्भीय पत्र यासोबत जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे आपल्यास्तरावर कार्यवाही करावी. (प्रत सलग्न)

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१५/१८७८
दिनांक : 23 NOV 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

विषय:- सामाजिक मागास विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकारणी न करण्याबाबत व परीक्षेला बसण्यापासून वंचित न करणेबाबत....

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/३१४ , दिनांक २४.२.२०१५
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी-२०१५/प्र.क्र. ४६ /शिक्षण-१, दिनांक ३०.३.२०१५

शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी वेळोवेळी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग , इतर मागासवर्ग या सामाजिक घटकातील विद्यार्थ्यांसाठी २००६-०७ पासून शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचे धोरण शासनाने मान्य केलेले असून ते शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत संदर्भाधीन दिनांक ३०.३.२०१५ मधील शासननिर्णयानुसार सुरू ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशनियमावलीमध्ये वेळोवेळी शिक्षण शुल्क (१०० टक्के किंवा ५०टक्के प्रकरणपरत्वे )प्रवेशाच्या वेळी न घेण्याबाबत धोरण अंतर्भूत करण्यात आलेले आहे. संचालनालयाकडून शैक्षणिक वर्ष २०१५-१६मधील प्रवेशाची कार्यवाही तेच धोरण विचारात घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहे.

**या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या परीक्षांचा कालावधी सुरू असून या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क भरलेले नाही या सबबीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास बाधा निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.** त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांकडून प्रवेश घेताना शिक्षण शुल्काची ( १०० टक्के किंवा ५० टक्के प्रकरणपरत्वे )आकारणी करण्यात येऊ नये अशा सुचना संचालनालयाच्या संदर्भाधीन दिनांक २४.२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये यापूर्वी देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचना विचारात घेऊन जोपर्यंत यासंदर्भात धोरणात्मक फेरसूचना शासन अथवा संचालनालय स्तरावरून देण्यात येत नाहीत तोपर्यंत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रवेशासंदर्भात हे धोरण सुरू ठेवावे.

उपरोक्त सुचनांचे पालन केले जात आहे किंवा कसे यासंदर्भात विभागीय सहसंचालकांनी आढावा घेऊन त्याबाबतची वस्तुस्थिती संचालनालयाच्या निदर्शनास आणून दयावी व कोणताही विद्यार्थी परीक्षेला बसण्यापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी

D:\Budage\२०१५-१६\General Correspondence\Fee concession to sc,st,vjnt,sbc,obc candidates.docx